# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

दूरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007

email address -rdc_akola@rediffmail.com web address :www.akolanic.in


क्र.कक्ष2/गृह/प्र.स./कावि ९५ /2020 दिनांक: १९ / 03 /2020

## *आदेश*

**तंबाखु व तंबाखुजन्य धुम्रपानाचे पदार्थ ई. ची विक्री करणारी सर्व दुकाने / पानटप-या इ. पुढील आदेशापर्यंत बंद ठेवण्याबाबत.**

वाचा - १. **प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. करोना- २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय मुंबई दिनांक १४ मार्च, २०२०**

२. **साथरोग अधिनियम,१८९७**

३. **सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांची अधिसूचना दिनांक १४ मार्च २०२०**

४. **फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ कलम १४३**

**ज्या अर्थी**, शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात **साथरोग अधिनियम १८९७ मधील खंड २,३ व ४** दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू केली असून महाराष्ट्र शासनाने कोव्हीड - १९ कोरोना विषाणू वर उपाययोजना **नियम-२०२०** नुसार दिनांक १४ मार्च २०२० रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. यातील नियम क्र. ३ नुसार कोरोना विषाणुमूळे (COVID-19) उद्भ्वलेल्या संसर्गजन्य रोगाचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंध व नियंत्रण या साठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत केले आहे. **आणि**

**ज्या अर्थी,** तंबाखु व तंबाखुजन्य पदार्थाचे सेवन करुन सार्वजनिक ठिकाणी थुंकणे व धुम्रपान करणे यामुळे करोना विषाणू चा प्रसार व प्रादुर्भाव होवू शकतो त्यामुळे असे पदार्थ विक्री करणारी दुकाने व पानटप-या बंद करणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाली आहे. **आणि**

**त्या अर्थी**, सध्या देशात आणि राज्यात कोरोना (कोव्हीड १९) चा फैलाव होण्याची शक्यता नाकारता येत नाही, तंबाखु व तंबाखुजन्य पदार्थाचे सेवन व धुम्रपान करण्याकरिता बहुतांश नागरीक दुकानावर, पानटप-यावर एकत्र येतात तसेच तंबाखुजन्य पदार्थाचे सेवन करुन सार्वजनिक ठिकाणी थुंकतात त्यामूळे सर्व सामान्य नारगीकांच्या जिवीतास धोका निर्माण होवून कोरोना विषाणूचा फैलाव होण्याची शक्यता नाकारता येत नाही, या दृष्टीकोनातून प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी अकोला जिल्हयामध्ये तंबाखु व तंबाखुजन्य पदार्थ , धुम्रपानाचे पदार्थ इ. ची विक्री करणारी ग्रामीण तसेच शहरी भागातील सर्व दुकाने, पानटप-या इ. दिनांक ३१ मार्च २०२० पर्यंत बंद ठेवण्यात यावीत असे आदेशित करीत आहे. **आणि**

**त्या अर्थी, फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २० व कल १४३** व कलम मधील तरदुनीनुसार अकोला जिल्हयातील सर्व पोलीस विभागातील सर्व अधिकारी, सर्व उपविभागीय दंडाधिकारी , सर्व तालुका दंडाधिकारी, मंडळ अधिकारी, महानगर पालिका आयुक्त, तसेच उपआयुक्त व या संदर्भाने



NitinN 53

नियुक्त केलेले सर्व अधिकारी/कर्मचारी तसेच सर्व नगर परिषदेचे व नगर पंचायतीचे मुख्याधिकारी, नगर परिषदेचे कर निरिक्षक व या संदर्भाने नियुक्त केलेले सर्व अधिकारी/कर्मचारी, सहा. आयुक्त, अन्न व औषधे प्रशासन, सर्व गटविकास अधिकारी, सर्व आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद व या संदर्भाने नियुक्त केलेले सर्व अधिकारी/कर्मचारी यांना **उक्त आदेशाची अंमलबजावणी करण्याकरिता यादवारे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.**

या आदेशादवारे विहीत करण्यात आलेल्या कोणत्याही निर्बधांची किंवा, काढलेल्या आदेशाची अवज्ञा करणा-या कोणत्याही व्यक्तीने, **भारतीय दंड संहिता, (१८६० चा ४५ ) याच्या कलम १८८** अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध केला आहे असे मानन्यात येईल.

सदर आदेश आज **दिनांक १९ मार्च २०२०** रोजी माझे स्वाक्षरी व शिक्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे.

**(जितेंद्र पापळकर, भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**अकोला**

**प्रतिलिपी -**

१. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई
२. उपसचिव, महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय मुंबई
३. मा. आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती.

यांना माहिती करिता सादर

४. **जिल्हा पोलीस अधिक्षक**, अकोला
५. **मुख्य कार्यकारी अधिकारी,** जिल्हा परिषद अकोला.
६. **आयुक्त महानगर पालिका,** अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव. त्यांनी उपरोक्त आदेशाची अंमलबजावणी करण्याचे दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी.
७. **जिल्हा शल्य चिकित्सक** सामान्य रुग्णालय, अकोला
८. **जिल्हा आरोग्य अधिकारी**, जिल्हा परिषद अकोला
९. **उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी** ---------------------------------- सर्व. यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव. त्यांनी आपले कार्यक्षेत्रामध्ये उपरोक्त आदेशाची अंमलबजावणी करुन अहवाल या कार्यालयास सादर करावा.
१०. **तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी** ---------------------------------------------सर्व. त्यांनी आपले कार्यक्षेत्रामध्ये उपरोक्त आदेशाची अंमलबजावणी करुन अहवाल या कार्यालयास सादर करावा.
११. **सहा. आयुक्त, अन्न व औषधे प्रशासन, अकोला** त्यांनी उपरोक्त आदेशाचे तंतोतत पालन होण्याचे दृष्टीने आवश्कय ती कार्यवाही करावी. अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.
१२. **मुख्याधिकारी** -------------------------------------------- नगर परिषद / नगर पंचायत सर्व
१३. **जिल्हा प्रशासन अधिकारी,** नगर पालिका प्रशासन, अकोला यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव.
१४. **जिल्हा माहिती अधिकारी, अकोला** यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव. त्यांनी सदर माहीतीस बातमिच्या स्वरुपात व्यापक प्रसिध्दी देण्याचे दृष्टीने विनामुल्य प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी.

**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**अकोला**